पोलीस अधीक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण
जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर.
फोन नं.0217-2729111
EmailID sp.solapur.r@mahapolice.co.in
hccb.solapur.rural@gmail.com

जा.क्र. पशा-७/निविदा जाहिरात प्रसिध्द/२०२६ E-4238259 सोलापूर ग्रा. दि. 20/04/2026

20 APR

## जाहिर निविदा (E Tender Notice)

******

पोलीस अधीक्षक, सोलापुर ग्रामीण आस्थापनेवरील श्वान पथकाकरिता सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षामध्ये आवश्यक असणारे श्वान खाद्य (Dog Food) व पशुवैद्यकीय औषधे यांचा नियमित व दर्जेदार पुरवठा सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने ई-निविदा प्रणालीद्वारे पात्र, अनुभवी व परवानाधारक पुरवठादारांकडुन सीलबंद ऑनलाईन निविदा (E Tender) मागविण्यात येत आहेत.

१) **कामाचे स्वरुप व तपशिल**

श्वान पथकाकरिता आवश्यक खाद्य साहित्य व पशुवैद्यकीय औषधांचा पशुवैद्यकीय अधिका-यांच्या सल्ल्यानुसार, निर्धारित दर्जानुसार व वेळेवर पुरवठा करणे.

एकुण श्वानांची संख्या

| अ.क्र. | श्वान पथक येथील श्वानांची संख्या | बीडीडीएस श्वान पथक येथील श्वानांची संख्या | सोलापुर ग्रामीण आस्थापनेवरील एकुण श्वानांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | ०५ | ०२ | ०७ |

आवश्यक खाद्याचा प्रकार व अंदाजे मासिक / वार्षिक प्रमाण

| अ.क्र. | खाद्याचा प्रकार | मासिक प्रमाण (एका श्वानाचे) | वार्षिक प्रमाण (एका श्वानाचे) |
|---|---|---|---|
| १ | रॉयल कॅनन कंपनीचे स्टार्टर फुड | १५ किलो | १८० किलो |
| २ | रॉयल कॅनन कंपनीचे पपी फुड | १५ किलो | १८० किलो |
| ३ | रॉयल कॅनन कंपनीचे अडल्ट फुड | १५ किलो | १८० किलो |
| ४ | एकुण ७ श्वानांसाठी आवश्यक फुड | १०५ किलो | १२६० किलो |

आवश्यक औषधांचा तपशील व प्रमाण

| अ.क्र. | औषधे | तपशील | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अँटी रेबीज वॅक्सिन | पशुवैद्यकीय अधिकारी यांचे सल्ल्यानुसार | पशुवैद्यकीय अधिकारी यांचे सल्ल्यानुसार |
| २ | डीएचपीपीआयएल वॅक्सिन | पशुवैद्यकीय अधिकारी यांचे सल्ल्यानुसार | पशुवैद्यकीय अधिकारी यांचे सल्ल्यानुसार |
| ३ | डि वर्मिंग | पशुवैद्यकीय अधिकारी यांचे सल्ल्यानुसार | पशुवैद्यकीय अधिकारी यांचे सल्ल्यानुसार |

२) **निविदा सादरीकरण**

सदर निविदा या कार्यालयाच्या संकेतस्थळावरच सादर करणे बंधनकारक राहील. ऑफलाईन / हस्ते / ई-मेलद्वारे प्राप्त निविदांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

३) पात्रता व अर्हता निकष :

i) संबंधित व्यवसायाचा वैध व अद्ययावत परवाना असणे आवश्यक आहे.

ii) GST नोंदणी व इतर वैधानिक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

iii) शासकीय / निमशासकीय संस्थांना समान प्रकारच्या पुरवठ्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

iv) पुरवठा दाराची आर्थिक व तांत्रिक क्षमता समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४) कालमर्यादा

निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि. १७/०४/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० पर्यंत राहील. नमुद मुदतीनंतर प्राप्त होणा-या कोणत्याही निविदांचा विचार करण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५) अटी व शर्ती

i) सर्व दर स्पष्ट, स्वतंत्र व अंतिम स्वरुपात नमुद करणे बंधनकारक राहील.

ii) पुरवठा दर्जेदार, प्रमाणित व पशुवैद्यकीय अधिका-यांच्या मार्गदर्शनानुसार असावा.

iii) अपुर्ण, त्रुटीपुर्ण अथवा अटींचे पालन न करणा-या निविदा कोणत्याही पुर्वसुचना न देता नामंजुर करण्यात येतील.

iv) निविदा प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारचा दबाव, प्रभाव किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्यास संबंधित निविदा तात्काळ रद्द करण्यात येईल.

v) कोणतीही निविदा संपुर्ण किंवा अंशत: स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम व सर्वस्वी अधिकार मा. पोलीस अधीक्षक, सोलापुर ग्रामीण यांचेकडे राखीव राहील.

( अतुल वि. कुलकर्णी )
पोलीस अधीक्षक सोलापुर ग्रामीण

प्रति,

प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे. / श्वान पथक.

२/- सदर निविदा मागविणेबाबतचे प्रसिध्दीपत्रक या कार्यालयाच्या www.solapurpolice.gov.in या संकेतस्थळावर करावे तसेच प्रभारी अधिकारी श्वान पथक यांनी सिलबंद निविदा आपले कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर ,आपलेकडील अहवालासह दि.२४/०४/२०२६ रोजी या कार्यालयास सादर कराव्यात.